# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३९०–२०१०–११/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. अनिल तानाजी कोरे ,<br>मु.पो. सावळज, ता. तासगांव, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभागीय कार्यालय, सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, सावळज, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u>** :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. अनिल तानाजी कोरे , मु.पो. सावळज, ता. तासगांव, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ चे कलम ६.१० मधील तरतुदीनुसार वितरण कंपनीविरुध्द दि. १९.१.२०११ रोजी तक्रार दाखल केली त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी आपल्या शेतात गट क्र. २६७/१ मध्ये ५ अश्वशक्तीसाठी वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. २५३५/– दि. ६.८.२०१० रोजी पावती क्र. ४३८४०४९ नुसार भरली. त्यानंतर तक्रारदार यांनी आपली तक्रार अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १६.८.२०१० रोजी दाखल केली.

त्यामध्ये कृती मानकातील तरतुदीनुसारच्या कालावधीत विद्युत पुरवठा मिळावा अशी मागणी केली. अंतर्गत कक्षाने दि. २०.९.२०१० ला आदेश पारित केले. ग्राहकाने सावळज उप विभाग यांचेकडे दि. १२.१०.२०१० ला चाचणी अहवाल सादर केला. अर्ज पूर्ण झाल्यानंतरही तीन महिन्यात वीज कनेक्शन मिळाले नसल्यामुळे वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मंचाकडे मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २२.२.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने वीज पुरवठ्यासाठी पैंसे भरल्याचे व चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले आहे. ग्राहकाचे कनेक्शनसाठी ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनी उभारणीचे काम आहे. अंतर्गत कक्षाच्या आदेशाप्रमाणे ग्राहकाने फेर चाचणी अहवाल सादर केल्यानंतर लघुदाब वाहिनीचे काम पूर्ण करुन दि. १६.२.२०११ ला शेतीपंपासाठी नव्याने विद्युत पुरवठा जोडून देण्यात आला आहे असे म्हटले आहे.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. ४.३.२०११ ला घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. सुर्यवंशी, सहाय्यक अभियंता, सावळज उप विभाग उपस्थित. सुनावणीचेवेळी श्री. सुर्यवंशी यांनी वि.प.चा मंचाला अग्रेषित केलेल्या दि. ४.३.२०११ च्या पत्रासोबत ग्राहकाने दि. २६.२.२०११ ला मंचाला अग्रेषित केलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत हजर केली. त्यामध्ये तक्रारदाराने दि. १६.२.२०११ ला वीज कनेक्शन मिळाले असल्यामुळे तक्रार अर्ज मागे घेत असल्याचे म्हटले आहे. वि.प.च्या दि. ४.३.२०११ अर्जावर ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी वरील तक्रार मागे घेणेस परवानगी मिळावी ही विनंती असे लेखी लिहून दिले आहे.

ग्राहकाच्या तक्रारीतील मागणी विचारांत घेता, विलंबाने वीज जोडणी झाली असल्यामुळे कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे मिळणाऱ्या भरपाईची मागणी तक्रारदाराने सोडून दिली आहे त्यामुळे तक्रार निकाली काढणे योग्य होईल.

## <u>आदेश</u>

१) ग्राहकाच्या तक्रारीचे वीज जोडणी मागणी पूर्ण झाल्यामुळे निवारण झाले आहे व विलंबापोटी भरपाईची मागणी ग्राहकाने सोडून देवून तक्रार मागे घेतली आहे. त्यामुळे तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.